फोन नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,
principal.gcoekarad@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड
(महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था)
विद्यानगर, कराड पिन — ४१५१२४ जि. सातारा

जा.क्र.शाअक/डिनअॅकेडमिक/२०२४-२०२५/3009 दिनांक:- 30 JUL 2024

**अत्यंत महत्वाची सुचना :-**

**विषय :- शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ करीता व्दितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष (Sem.- III, V, VII) बी. टेक. अभ्यासक्रम प्रत्यक्ष प्रवेशाबाबत...**

उपरोक्त विषयानुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे कामकाज दिनांक १५/०७/२०२४ पासून सुरु झाले असून **व्दितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष (Sem.- III, V, VII) बी. टेक.** अभ्यासक्रमाचे प्रत्यक्ष प्रवेशाचे कामकाज **ऑनलाईन पध्दतीने** MIS व्दारे फी भरुन दिनांक २४/०७/२०२४, २५/०७/२०२४ व दि.२९/०७/२०२४ या कालावधीत सुरु ठेवण्यात आलेले होते. **तथापि अतिवृष्टीमुळे ज्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेशासाठी उपस्थित राहता आले नाही. असे विद्यार्थी व ज्या विद्यार्थ्यांच्या इतर अडचणी असल्यामुळे वरील दिनांकांना प्रत्यक्ष प्रवेश घेता आला नाही. अशा वरील अभ्यासक्रमांचे सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेशाचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने MIS व्दारे फी भरुन खालील वेळापत्रकानुसार करावयाचे आहे.**

| अ.क्र. | वर्ग व शाखा | विद्यार्थी विभागात प्रत्यक्ष येऊन प्रवेश निश्चित करुन प्रवेश अर्ज विद्यार्थी विभागात जमा करावयाचा दिनांक |
|---|---|---|
| १. | व्दितीय वर्ष बी. टेक. सर्व शाखा | ०५/०८/२०२४ |
| २. | तृतीय वर्ष बी. टेक. सर्व शाखा | ०६/०८/२०२४ |
| ३. | चतर्थ वर्ष बी. टेक. सर्व शाखा | ०७/०८/२०२४ |

१. तसेच SC, ST, VJNT, SBC & OBC या संवर्गातील विद्यार्थ्यांनी फी सवलत घेतली असेल अशा वर नमुद केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे महाडिबीटी लॉगीन मधील रिडीम व्हाऊचर यापुर्वी महाडिबीटी संकेतस्थळावर केलेल्या अर्जामधून हार्ड कॉपी प्रिंट सोबत जोडलेल्या (Scholarship No Dues) नमुन्यात भरुन प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

२. ज्या विद्यार्थ्यांचे बँक खात्यावर महाडिबीटीव्दारे संस्थेच्या हिश्याची रक्कम जमा झालेली असेल अशी सर्व रक्कम शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ चे प्रवेश घेते वेळी एक रक्कमी भरावी. तद्नंतरच पुढील अभ्यासक्रमाचा प्रवेश निश्चित केला जाईल याची नोंद घ्यावी.

३. SC संवर्गातील विद्यार्थ्यांचे बँक खात्यावर केंद्र सरकारकडून डीबीटीव्दारे थेट विद्यार्थ्यांचे खातेवर ६० टक्के रक्कम जमा झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी सदरची रक्कम संस्थेस जमा करावी. तसेच यापुर्वी SC संवर्गातील विद्यार्थ्यांनी रक्कम संस्थेच्या खात्यात जमा केली असल्यास त्याची प्रवेश अर्जासोबत पावती जोडणे आवश्यक राहील.

**प्रत्यक्ष प्रवेश अर्ज जमाकरतेवेळी जोडावयाची कागदपत्रे खालील प्रमाणे.**

२. सर्व गुणपत्रिका
२. जातीचा दाखला
३. जात वैधता प्रमाणपत्र
४. तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला, नॉनक्रिमीलेअर (जे लागू असेल ते)
५. आधार कार्ड

इत्यादीच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित करुन सोबत जोडाव्यात.

तरी सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या दिनांकास ऑनलाईन पध्दतीने प्रवेश शुल्क जमा करुन वरील दिनांकास आपला प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

प्रत- १.सर्व विभाग प्रमुखांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी. तसेच सूचना फलकावर लावणेसाठी.
२.महाविद्यालयाचे वेबसाईटवर प्रदर्शित करणे करीता.